

केईएम रुग्णालय : मुकुल माधव फाउंडेशन तर्फे रुग्णालयात सुरू करण्यात आलेल्या नवजात अतिदक्षता विभागाचे (एनआयसीयू) 'सोनाली द लिटल स्टार्स रूम' असे नामकरण करण्यात आले. यावेळी आशा जैठा, रितु छाब्रिया, मनिष जैठा, मनिषा जैठा व गायत्री छाब्रिया उपस्थित होते.

# नवजात अतिदक्षता विभागाचे केईएम रुग्णालयात नामकरण

**पुणे, दि. ३० (प्रतिनिधी)** - मुकुल माधव फाउंडेशनतर्फे केईएम रुग्णालयातील नवजात अतिदक्षता विभाग (एनआयसीयू) सुरू करण्यात आला असून, या विभागाचे नामकरण करून 'सोनाली द लिटल स्टार्स रूम' असे नाव देण्यात आले आहे.

या नवीन विभागाचे उद्घाटन स्पायका इलास्टिक प्रा. लिमिटेडचे संचालक रजनीकांत जैठा यांच्या पत्नी आशा जैठा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे व मुकुल माधव फाऊंडेशनचे संस्थापक प्रल्हाद छाब्रिया, अध्यक्ष प्रकाश छाब्रिया, व्यवस्थापकीय विश्वस्त रितु छाब्रिया, रूग्णालयाचे चिकित्सा निर्देशक डॉ. के. जे. कोयाजी, बालतज्ज्ञ विभागाचे डॉ. ए. एन. पंडित, स्पायका इलास्टीक प्रायव्हेट लिमिटेडचे मनिष जैठा व मनिषा जैठा, गायत्री छाब्रिया उपस्थित होते.

सोनाली द लिटल स्टार्स रूम म्हणजेच नवजात अर्भक अतिदक्षता विभाग होय. यामध्ये ६ बेड असून, एक व्हेंटिलेटर, बबल, सीपीएपी, पल्स ऑक्झिमीटर, फोटोथेरपी, सिरींज पंप व वॉर्मर असा सोयी-सुविधांनी हा विभाग सज्ज आहे. ज्या व्यक्तींची आर्थिक परिस्थिती हलाकीची आहे व सामान्य नागरिकांसाठी ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यावेळी प्रकाश छाब्रिया यांनी मनोगत व्यक्त केले. छाब्रिया यांची बहीण सोनाली यांचे लहानपणी निधन झाले. त्यांच्या नावाने हा विभाग सुरू करण्यात आला आहे.